आकाशवाणी मुंबई
राष्ट्रीय बातमीपत्र - रात्री ८.०५ वाजता
२ फेब्रुवारी २०२६ - सोमवार

**ठळक बातम्या**

- संसदेत राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या अभिभाषणावरच्या धन्यवाद प्रस्तावावरच्या चर्चेला सुरूवात

- आर्थिक वर्ष २०२६-२७ च्या अर्थसंकल्पात महाराष्ट्रातल्या रेल्वेसाठी २३हजार ९२६ कोटी रुपयांची तरतूद केल्याची रेल्वेमंत्र्यांची माहिती

- धर्मगुरू दलाई लामा आणि के पॉप यांना पहिल्यांदाच ग्रॅमी पुरस्कार, तर हवामान शास्त्रज्ञ वीरभद्रन रामनाथ यांना रॉयल स्वीडीश अकादमी ऑफ सायन्सेसकडून यंदाचा भूविज्ञानासाठीचा क्रॉफर्ड पुरस्कार जाहीर

**आणि**

- मुंबई शेअर बाजाराच्या सेन्सेक्समधे ९४४ अंकांची वाढ

**<><><><><>**

लोकसभेत आज राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या अभिभाषणावरच्या धन्यवाद प्रस्तावावरच्या चर्चेला सुरूवात झाली. राष्ट्रपतींचा संदेश अतिशय महत्त्वपूर्ण होता असं म्हणत केंद्रीय मंत्री सर्बानंद सोनोवाल यांनी धन्यवाद प्रस्ताव मांडला. देशाच्या भविष्याविषयी अतिशय प्रभावी दृष्टीकोन राष्ट्रपतींनी या भाषणात व्यक्त केला. सामाजिक न्याय, सर्वसमावेशक विकास आणि विकसित भारताचं सरकारंचं  उद्दिष्ट यात प्रतिबिंबित होत असल्याचं सोनोवाल म्हणाले. त्यानंतर खासदार तेजस्वी सूर्या यांनी यावर भाषण केलं. गेल्या १२ वर्षात केंद्र सरकारवर एकही भ्रष्टाचाराचा आरोप झाला नसल्याचं ते यावेळी म्हणाले. विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी यावर बोलायला सुरुवात केल्यावर सत्ताधारी पक्षाच्या नेत्यांनी त्यांच्या काही मुद्द्यांवर आक्षेप घेतला. त्यानंतर झालेल्या गदारोळामुळं लोकसभेचं कामकाज आधी २ वेळा आणि नंतर दिवसभरासाठी तहकूब झालं.

**<><><><><>**

राज्यसभेत आज राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या अभिभाषणावरच्या धन्यवाद प्रस्तावावरच्या चर्चेला सुरूवात झाली. या चर्चेसाठी १६ तास  देण्यात आले आहेत.

राष्ट्रपती मुर्मू यांनी त्यांच्या भाषणात विकसित भारताच्या दिशेनं भारताच्या प्रवासाचा स्पष्ट दृष्टिकोन मांडल्याचं नामनिर्देशित सदस्य सी सदानंद मास्टर यांनी धन्यवाद प्रस्ताव मांडताना सांगितलं.

सरकार शेतकरी आणि कामगारविरोधी असल्याचा आरोप काँग्रेसचे दिग्विजय सिंह यांनी केला. केंद्रीय अर्थसंकल्पात आरोग्य आणि कृषी क्षेत्रांसाठी कमी निधी दिला असल्याची टीका ‘आप’चे संजय सिंह यांनी केली.

<><><><><>

आर्थिक वर्ष २०२६-२७ च्या अर्थसंकल्पात महाराष्ट्रातल्या रेल्वेसाठी २३ हजार ९२६कोटी रुपयांची विक्रमी तरतूद केल्याची माहिती रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांनी दिली. नवी दिल्लीतून घेतलेल्या वार्ताहर परिषदेत त्यांनी राज्यातल्या पत्रकारांना दूरस्थ पद्धतीनं संबोधित केलं. राज्यात मुंबई ते पुणे आणि पुणे ते हैदराबाद या दोन बुलेट ट्रेन्सनाही या अर्थसंकल्पात मान्यता दिली आहे. हे प्रकल्प पूर्ण झाल्यानंतर मुंबई ते पुणे हा प्रवास ४८ मिनिटांवर येईल, तर पुणे ते हैदराबाद १ तास ५५ मिनिटांत पोहोचता येईल, असं त्यांनी सांगितलं.

कालच्या अर्थसंकल्पात मान्यता मिळालेला नवा मालवाहतूक कॉरिडॉर राज्यातल्या वाढवण बंदरालाही जोडण्याची योजना आहे. राज्यात एकंदर १ लाख ७० हजार कोटी रुपयांचे रेल्वेचे प्रकल्प सुरू असल्याचं त्यांनी सांगितलं.

<><><><><>

केंद्र सरकार 'माय भारत बजेट क्वेस्ट', हा उपक्रम सुरू करणार असल्याची घोषणा युवा व्यवहार आणि क्रीडा मंत्री मनसुख मांडवीय यांनी आज नवी दिल्लीत केली. ‘माय भारत’ प्लॅटफॉर्मवर उद्यापासून ही स्पर्धा सुरु होणार असल्याची माहिती त्यांनी यावेळी दिली. येत्या १७ तारखेपर्यंत या स्पर्धेसाठी नोंदणी करता येईल. पहिल्या फेरीत ३० प्रश्नांची ऑनलाईन प्रश्नमंजुषा असेल. या फेरीत प्रत्येक राज्यातल्या सर्वोत्तम कामगिरी करणाऱ्यांची निवड होईल, त्यानंतर निबंध लेखन फेरी असेल. या फेरीत युवकांना यंदाच्या अर्थसंकल्पावर आधारित ८ विषय दिले जातील.

निबंध लेखन फेरीत निवड झालेल्या युवकांना पुढच्या महिन्यात ‘विकसित भारत’ अर्थसंकल्पाच्या दृष्टिकोनावर प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्याशी संवाद साधण्यासाठी निमंत्रित केलं जाईल अशी माहिती मांडवीय यांनी दिली.

<><><><>

दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेसच्या विलीनीकरणासंदर्भात भाजपाच्या वरीष्ठ नेत्यांना विचारावं लागेल, असं अन्न आणि नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ यांनी म्हटलं आहे. ते आज नाशिकमधे बातमीदारांशी बोलत होते. विलिनीकरणाबाबत दिवंगत नेते अजित पवार यांची कुणाशी काय चर्चा झाली याची आम्हाला कुणालाही कल्पना नाही. आता बदललेल्या परिस्थितीत उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्या नेतृत्वाखाली चर्चा करावी लागेल, असं ते म्हणाले.

अजित पवार यांच्या विमानाला झालेली दुर्घटना हा अपघात होता, यात संशयास्पद काही वाटत नसल्याचही त्यांनी स्पष्ट केलं.

<><><><>

धर्मगुरू दलाई लामा आणि के पॉप डेमॉन हंटर्स यांना यंदाचा ग्रॅमी पुरस्कार घोषित झाला आहे. त्यांचा हा पहिलाच ग्रॅमी पुरस्कार आहे. श्राव्य पुस्तकं, कथाकथन या श्रेणीत दलाई लामा यांना हा पुरस्कार मिळाला. तर  दृकश्राव्य श्रेणीत के पॉप यांच्या गोल्डन या गाण्याला हा पुरस्कार मिळाला.

Music for John Williams या अल्बमसाठी दिग्दर्शक स्टीव्हन स्पीलबर्ग यांनाही पहिल्यांदाच ग्रॅमी पुरस्कार मिळाला आहे.

<><><><>

भारतीय वंशाचे हवामान शास्त्रज्ञ वीरभद्रन रामनाथ यांना रॉयल स्वीडीश अकादमी ऑफ सायन्सेसनं २०२६ या वर्षाचा भूविज्ञानासाठीचा क्रॉफर्ड पुरस्कार जाहीर केला आहे. भूविज्ञानाच्या क्षेत्रातला नोबेल म्हणून हा पुरस्कार ओळखला जातो. सुमारे ९ लाख डॉलर आणि सुवर्णपदक असं या पुरस्काराचं स्वरुप आहे. ८२ वर्षाचे असलेले रामनाथन कॅलिफोर्निया विद्यापीठात प्रतिष्ठीत प्राध्यापक म्हणून कार्यरत आहेत.

कार्बन डायऑक्साइडच्या तुलनेत १० हजार पट अधिक कार्यक्षमतेने क्लोरोफ्लुरोकार्बन वातावरणात उष्णता साठवून ठेवतात असा शोध त्यांनी नासामध्ये

कार्यरत असताना १९७५ मध्ये लावला होता. तोपर्यंत जागतिक तापमान वाढीला कार्बन डायऑक्साइड जबाबदार असल्याचा समज होता. मदुराईमध्ये जन्मलेले आणि चेन्नईत मोठे झालेल्या रामनाथन यांनी सिकंदराबादमध्ये फ्रीजच्या कारखान्यात पहिली नोकरी केली होती.

<><><><><>

अर्थसंकल्पानंतर मोठ्या प्रमाणात घसरलेले देशातले शेअर बाजार आज सावरले. दिवसअखेर सेन्सेक्स ९४४ अंकांची दमदार तेजी नोंदवून ८१ हजार ६६६ अंकांवर बंद झाला. तर निफ्टी २६३ अंकांनी वधारुन २५ हजाराच्या पातळीच्या वर येऊन २५ हजार ८८ अंकांवर स्थिरावला. काल झालेल्या घसरणीनंतर गुंतवणूकदारांनी समभागांची खरेदी केल्यानं शेअर बाजारात वाढ दिसून आली.

सोन्या-चांदीच्या दरात ४ दिवसांपासून सुरू असलेली घसरण आजही कायम आहे. गेल्या ४ दिवसात चांदी किलोमागे १ लाख २० हजार रुपयांनी, तर सोनंही तोळ्यामागे सुमारे २६ हजार रुपयांनी स्वस्त झालं आहे.

<><><><><>

संरक्षण लेखा विभागात प्रशासन आणि निर्णय प्रक्रिया अधिक सक्षम करण्यासाठी कृत्रिम बुद्धिमतेचा वापर वाढवण्यात येणार असल्याचं संरक्षण लेखा नियंत्रक जनरल विश्वजीत साहाय यांनी सांगितलं. ते आज पुण्यात आयोजित संरक्षण विभागाच्या राष्ट्रीय वित्तीय व्यवस्थापन संस्थेच्या पायाभरणी समारंभात बोलत होते. नवीन प्रशिक्षण केंद्रामुळे भारतीय संरक्षण लेखा सेवेतल्या अधिकाऱ्यांना दीर्घकालीन व्यवसायिक प्रशिक्षण मिळू शकेल, असं सहाय यांनी सांगितलं.

<><><><><>

सेशेल्सचे अध्यक्ष पॅट्रिक हर्मिनी येत्या ५ ते १० फेब्रुवारी दरम्यान भारताच्या दौऱ्यावर येणार आहेत. गेल्या ऑक्टोबरमध्ये पदभार स्वीकारल्यानंतर हर्मिनी यांचा हा पहिलाच भारत दौरा आहे. दोन्ही देशांमधल्या राजनैतिक संबंधांच्या ५०व्या वर्धापन दिनानिमित्त हा दौरा होत आहे. या दौऱ्यात ते सर्वप्रथम राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांची भेट घेतील आणि प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्याशी प्रादेशिक आणि आंतरराष्ट्रीय मुद्द्यांवर चर्चा करतील.

त्यानंतर ते चेन्नई आणि मुंबईला भेट देतील, अशी माहिती परराष्ट्र मंत्रालयाने आपल्या निवेदनात म्हटलं आहे.

<><><><><>

**ठाणे** जिल्ह्यातल्या ठाणे, कल्याण-डोंबिवली आणि उल्हासनगर या तिन्ही महापालिकेत महिलांना महापौरपद देण्याचा निर्णय शिवसेनेनं घेतला आहे. ठाण्यातून शर्मिला पिंपळोलकर-गायकवाड, कल्याण डोंबिवलीत हर्षाली थविल चौधरी आणि उल्हासनगरमध्ये अश्विनी निकम यांची महापौरपदी वर्णी लागणार आहे. दरम्यान आज विविध महानगरपालिकांच्या महापौर आणि उपमहापौर पदांसाठी अनेक उमेदवारांनी अर्ज दाखल केले.

<><><><><>

मुंढवा जमीन गैरव्यवहार प्रकरणात पुणे पोलिसांनी दाखल केलेल्या आरोपपत्रात दिग्विजय पाटील आणि पार्थ पवार यांचं नाव नाही. यात केवळ शीतल तेजवाणी यांचा उल्लेख आहे. पुणे पोलिसांच्या आर्थिक गुन्हे शाखेनं न्यायालयात १ हजार ८८६ पानांचं आरोपपत्र दाखल केलं आहे.

<><><><><>

पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री आणि तृणमूल काँग्रेसच्या अध्यक्ष ममता बॅनर्जी यांनी आज एसआयआरमुळे बाधित झालेल्या कुटुंबं आणि पक्षाच्या नेत्यांसोबत मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांची भेट घेतली. बंगालचे नागरिक निवडणूक आयोगासमोर आपले प्रश्न मांडण्यासाठी आले आहेत. परंतु त्यांना धमक्या दिल्या जात असल्याचा आरोप बॅनर्जी यांनी केला आहे.

//<><><><><>//